डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. (अर्थशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध-प्रबंधाचा अंतिम सारांश आराखडा

संशोधन विषय

''विमुक्त जाती व भटक्या जमातींचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास : संदर्भ मराठवाडा व विदर्भ ''

✵ संशोधक ✵
अरुण रामराव चव्हाण

✵ मार्गदर्शक ✵
डॉ. ए. एस. पवार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

मार्च - २०१३

प्रस्तावना :-

भारतात अनेक जाती-जमाती असून त्यात विमुक्त-भटक्या जाती-जमाती विशेष उल्लेखनीय आहेत. अत्यंत प्राचीन काळापासून म्हणजेच आर्य भारतात येण्याच्या अगोदरपासून विमुक्त-भटक्या जाती-जमाती भारतात राहतात. मात्र तेव्हा त्या जाती-जमाती विमुक्त-भटके म्हणून ओळखल्या जात नव्हत्या, कारण भारतात त्या जाती-जमाती स्थायी जीवन जगत होत्या. त्यामध्ये निग्रोही, ऑस्ट्रेलाईन व मेडिटरेनिअन वंशाच्या लोकांचाही समावेश होतो. तसेच अल्पोईन व मंगोलाईट वंशाचे लोक इरान, इराक, अफगानिस्थान आदि मार्गाने भारतात आले व स्थायिक झाले त्यांचाही समावेश होतो. या सर्व जाती-जमातीचे लोक भारतात अत्यंत कष्ट करून आपली उपजिविका करीत होते. तेव्हा 'सिंधू संस्कृती' वैभवाच्या व समृद्धीच्या शिखरावर होती. या समृद्ध व वैभवशाली सिंधू संस्कृतीत भटक्यांना विशेष स्थान होते. सर्व जाती-जमातीचे लोक पूर्णाधिकाराचे जीवन जगत होते.

सिंधू संस्कृती कालखंडाच्या उत्तरार्धात म्हणजेच इ.स. पूर्व १५०० वर्षापूर्वी आर्यांनी भारतात प्रवेश केला. हिंसक व लढाऊ वृत्तीच्या आर्यांनी भारतातील स्थायिक लोकांना तात्काळ जिंकले. त्यांना गुलामी पत्करण्यास भाग पाडले, त्यांच्याकडून शेती व शेतीशी संबंधित कामे करून घेऊ लागले. ज्यांना आर्यांची गुलामी मान्य होती ते लोक गावातच राहिले व गुलाम झाले. परंतु ज्यांना आर्यांची गुलामी नको होती त्यांनी गाव सोडून सापडेल तिथे रानावनात, डोंगरदऱ्यात आश्रय घेतला. गावाबाहेर राहून भटकंती स्वीकारली ते भटके झाले आणि भटकतच राहिले. तेव्हापासून भटका शब्द प्रचलित झाला. या भटक्यांची अर्थव्यवस्था पूर्णत: नष्ट झाली आणि अर्थव्यवस्थाच नव्हे तर समाज व्यवस्था व संस्कृती देखील बदलून गेली.

आजचा हा भटका समाज सिंधू संस्कृतीच्या कालखंडात वैभवशाली जीवन जगत होता. त्यांचे विशाल व शांतिपूर्ण राज्य होते. याची माहिती हडप्पा आणि मोहेंजोदडो येथे झालेल्या उत्खनन कार्यातून जगाला प्राप्त झाली आहे. यावरून असे लक्षात येते की, आजचा भटका समाज हा मूळचा भटका नसून तो भटका बनवला गेला आहे. अगदी प्राचीन काळापासून या भटक्या समाजावर अन्याय होत आलेला आहे आणि तो आजही होत आहे. आजही हा समाज शिक्षणापासून वंचित राहून जेमतेम आपला उदरनिर्वाह करीत आहे. देश स्वतंत्र असूनही या जमाती पारतंत्र्यात असल्यासारखे जीवन जगत आहेत. या जागतिकीकरणाच्या युगात भटक्यांना उदरनिर्वाहाचाच प्रश्न भेडसावत आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेत विमुक्त-भटक्यांना एक विशेष स्थान असायला हवे होते, परंतु जागतिकीकरण म्हणजे नेमके काय? हे देखील अनेक विमुक्त-भटक्यांना माहीत नाही. भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर असताना या जमाती अत्यंत निकृष्ठ जीवन जगत आहेत. या जाती-जमातींना उच्च शिक्षण नाही, नोकरी नाही, सरकारच्या योजना मिळत नाहीत. अत्यंत दारिद्रय जीवन या जमाती कंठीत आहेत, पोटासाठी गावोगावी भटकत आहेत. केवळ उदरनिर्वाहाचा प्रश्न केंद्रबिंदू मानून या जमातीला भटकावे लागत आहे. या अस्थिरतेमुळे त्यांना शिक्षण घेणे कठीण होत आहे. अशा भटकणाऱ्या जमातीच्या पाल्यांसाठी शासनाने 'आश्रम शाळा' दिल्या. परंतु एकंदरीत आश्रमशाळांची संख्या आणि विमुक्त-भटक्या जमातीच्या पाल्यांची संख्या यांचा मेळ जमत नाही. अनेक पाल्यांना प्रवेश मिळत नाही. ज्यांना प्रवेश मिळतो त्यांना सुविधेची कमतरता आहे. म्हणून विमुक्त-भटक्यांचा विकास होणे कठीण वाटते. विमुक्त-भटक्यांचा विकास करण्यासाठी स्वतंत्र विमुक्त-भटक्यांसाठी भरीव तरतूद असणाऱ्या योजना देण्याची गरज आहे. परंतु तशा कोणत्याही विशेष योजना विमुक्त-भटक्यांसाठी नाहीत. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत भटक्यांना कोणतेही स्थान नाही, असेच म्हणावे लागते.

विमुक्त-भटक्यांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रथम त्यांची जाती-निहाय जणगणना इंग्रज कालखंडात झालेली आहे. त्यानंतर कोणत्याही पद्धतीने या जाती-जमातीची गणना झालेली नाही. म्हणून आज विमुक्त-भटक्यांची एकूण लोकसंख्या किती आहे? याचा अंदाज बांधणे देखील कठीण आहे. तेव्हा या विमुक्त-भटक्यांसाठी आर्थिक तरतूद किती करावी? हा प्रश्न कसा सुटेल, हा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. एकंदरीत या स्थितीमुळे विमुक्त-भटक्यांना भारतीय अर्थव्यवस्थेत न्याय मिळत नाही. म्हणून आर्थिक विकासाच्या प्रवाहापासून हा समाज कोसो दूर असल्याचा दिसून येतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेत विमुक्त-भटक्यांना कोणतेही अधिष्ठान प्राप्त झालेले नाही. म्हणून आपल्या देशात आजही काही जमाती भटकत आहेत. त्यामागे महत्त्वाची कारणे म्हणजे एक आर्थिक कमकुवतपणा, एका ठिकाणी पोट भरेल अशी निश्चित उत्पन्नाच्या साधनांचा अभाव, ज्यामुळे त्यांना भटकावे लागले. या भटकणाऱ्या जमातींची संपत्ती म्हणजे गुरे-ढोरे,गुराढोरांना एका ठिकाणी चारापाणी मिळेल अशी स्थिती नसल्यामुळे भटकावे लागे. काही काळानंतर या जमातीला भटकण्याची ती सवय लागली. भटकण्याशिवाय त्यांना करमेनासे झाले. त्यामुळे भटकणे, भटकेपणा हा त्यांच्या जीवनातील जीवनमार्ग बनला. त्या जमाती आज भटक्या जमाती म्हणून ओळखल्या जातात तर काही जाती विमुक्त जाती म्हणूनही ओळखल्या जातात.

पोटासाठी भटकणारा तो 'भटका' असे विशेषण तथाकथित प्रस्थापित व्यवस्थेने लावून टाकले. जातीव्यवस्थेने भटकणाऱ्या जमातीचे कामानुसार विभाजन केले, म्हणून त्यांच्यात जाती, पोटजाती, उपजाती, तत्समजाती असे काही प्रकार उदयास आले. त्यातूनच विमुक्त जाती असा एक गट बाहेर पडला आहे. त्यांच्यात देखील उपजाती-पोटजाती आहेत. या जमाती देखील भटकणाऱ्याच आहेत. परंतु विमुक्त नावाने ओळखल्या जातात. इंग्रज सरकारने १८७१ मध्ये 'गुन्हेगार जमाती कायदा' लागू करून काही जाती समुहाला गुन्हेगार माणून बंदिस्त केले होते. या गुन्हेगार जाती समुहाला भारत स्वातंत्र्य झाल्यावर १९५२ मध्ये मुक्त करण्यात आले. तेव्हापासून 'विमुक्त जाती' असा एक गट उदयास आला आणि तो प्रचलित झाला.

विमुक्त आणि भटक्या या दोन्ही प्रकारच्या जाती-जमातीचा 'सूक्ष्म' पद्धतीने अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. आर्थिक दृष्टिकोनातून चिकित्सा करण्यासारखा अभ्यास आजपर्यंत या जाती-जमातींचा झालेला नाही. म्हणून आर्थिक निर्देशकाच्या आधारे विमुक्त-भटक्यांची अर्थव्यवस्था अभ्यासणे महत्त्वाचे वाटते. शासकीय स्तरावर काही प्रमाणात या जाती-जमातीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. १९९३ च्या वधवा समितीने काही बाबींचा उलगडा केलेला आहे. परंतु त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. २००८ साली श्री. बाळकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला गेला. स्थिर जीवन आणि जगण्याची समान संधी मागणारा हा अहवाल केंद्रशासनाकडे पडून आहे. प्रस्थापित व्यवस्था आणि यंत्रणा कोणतेही पाऊल उचलत नाही. यंत्रणेला काही शंका असेल तर जाती-जमातीचा पुन्हा अभ्यास करता येऊ शकतो. त्यासाठी कोणते का होईना सरकारने निर्णय घेणे अपेक्षित आहे. परंतु तसे होत नाही ही खंत वाटण्यासारखी बाब आहे.

या सर्व बाबींचा आढावा घेऊन विमुक्त-भटक्या जमातीचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले. विमुक्त-भटक्यांची वर्तमान आर्थिक स्थिती अभ्यासणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश जरी असला तरी त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर बाबींची पडताळणी करणे हे देखील तेवढेच महत्त्वाचे माणून समग्र बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

आर्थिकदृष्ट्या मागास, आदिवासी, विमुक्त-भटक्या जमातींच्या विकासासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. अनेक योजना शासकीय स्तरावर राबविल्या जात आहेत. परंतु त्यांचा योग्य अशा प्रकारचा फायदा आजही विमुक्त-भटक्या जमातींना झालेला नाही. मराठवाडा आणि

विदर्भाच्या ग्रामीण भागात बहुतांश विमुक्त-भटके लोक निकृष्ठ जीवन जगत आहेत. भारत स्वातंत्र होऊन ६५ वर्षे उलटून गेली आहेत. तरी या जाती-जमातीचा विकास कसा झालेला नाही? त्यांच्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत त्या योजनांचा परिणाम का दिसून येत नाही? विमुक्त-भटके मागास म्हणूनच का ओळखले जातात? त्यांना गावोगावी का भटकावे लागत आहे? या जमाती उच्च शिक्षणापर्यंत का पोहचत नाहीत? जागतिकीकरणाच्या युगात विमुक्त-भटक्यांना कोणते स्थान आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधून विमुक्त-भटक्या जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली, हे अभ्यासणे महत्त्वाचे वाटले.

संशोधना करिता ''विमुक्त जाती व भटक्या जमातीचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास : संदर्भ मराठवाडा व विदर्भ'' या कक्षेत शिक्षण, राहणीमान, धार्मिक परंपरा, सामाजिक ठेवण, अंधश्रद्धा, शासकीय योजनांचा लाभ, दारिद्रय, रोजगार, उत्पन्नाची पातळी आणि विमुक्त-भटक्यांच्या विकासातील मुळ समस्या इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच वरील सर्व मुख्य घटकासोबत जी उपप्रश्ने निर्माण झाली आहेत, त्यांचाही अभ्यास केला आहे. एकंदरीत विमुक्त-भटक्यासाठी हे संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे, त्याचबरोबर पुढे विमुक्त-भटक्या जमातीवर संशोधन करू इच्छिणाऱ्या संशोधकांसाठी देखील हे संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधनासाठीचे उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे नमूद करण्यात आली आहेत.

१. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीचे राहणीमान अभ्यासणे.

२. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीच्या शैक्षणिक स्थितीवर प्रकाश टाकणे.

३. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीतील दारिद्रयाचे प्रमाण शोधणे.

४. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीचे स्थलांतरण किंवा भटके जीवन या बाबतची माहिती घेणे.

५. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीत विविध शासकीय योजनांच्या लाभाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके विचारात घेतली आहेत.

१. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीचे राहणीमान निकृष्ठ आहे.

२. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीतील कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ अतिशय अल्प प्रमाणात मिळत आहे.

३. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीतील उच्च शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.

४. मराठवाडा व विदर्भातील भटक्या-विमुक्त जमातीत काही कुटुंबे दारिद्रयात जीवन जगत आहेत.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक आणि द्वितीयक आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीयक आधारसामग्रीमध्ये शासनाचे वेळोवेळी प्रकाशित अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, जिल्हा समाजकल्याण विभागचा अहवाल, भारत सरकारचा जनगणना अहवाल असे महत्त्वाचे दस्ताऐवज उपयोगात आणले आहेत. त्याचप्रमाणे संशोधनाशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, अहवाल, अप्रकाशित प्रबंध, मुखपत्रे, स्मरणिका इ. घटकांचा आधार घेऊन त्यामधील माहिती उपयोगात आणली आहे.

प्राथमिक माहितीच्या आधारे अध्ययनासाठी मराठवाडा आणि विदर्भ हे दोन प्रादेशिक विभाग निवडले आहेत. प्रत्येक विभागातून २०० विमुक्त-भटक्या जमातीची कुटुंबे असे एकूण ४०० विमुक्त-भटक्या जमातीच्या कुटुंबाची प्रत्यक्ष पाहणीसाठी निवड केली आहे. महाराष्ट्रातील विमुक्त-भटक्या जमातीच्या मिळून ४३ जाती-जमाती आहेत. त्यापैकी ५ विमुक्त जाती आणि ५ भटक्या जमाती अशा एकूण १० जाती-जमातींचा अभ्यास करण्यात आला आहे. या जाती-जमातींची प्रत्यक्ष पाहणी करताना त्यांची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थिती तसेच त्यांना शासकीय योजनांचा प्राप्त होणारा लाभ या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण बाबींच्या संदर्भात माहिती गोळा करून, प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. हे विश्लेषण करताना विविध सांख्यिकीय साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. त्या सांख्यिकीय साधनांची माहिती पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

१) Co-efficient of correlation

Formula $r = \dfrac{\sum dxdy \times n \quad - \quad (\sum dx \times \sum dy)}{\sqrt{\sum dx^2 \times n - (\sum dx)^2}\sqrt{\sum dy^2 \times n - (\sum dy)^2}}$

२) Calculation of Mean

Formula - $\overline{X} = X + \dfrac{\sum dx}{n}$

३) Calculation of Standard Deviation

Formula $\partial = \sqrt{\dfrac{\sum dx^2}{n} - \left(\dfrac{\sum dx}{n}\right)^2}$

४) Calculation Value of 't'

Formula $t = \dfrac{\overline{X} - M}{\partial} \sqrt{n-1}$

५) Population Growth Rate

Formula $r = \dfrac{P_1 - P_0}{P_0} \times 100$

६) Per capita population Growth Rate

Formula $r_p = \dfrac{P_1}{P_0}$

Formula $p = \dfrac{P_1}{P_0} \times 100$

वरील विविध प्रकारच्या आणि नामांकित अशा सांख्यिकीय साधनांचा उपयोग करून सांख्यिकीय माहितीचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच सांख्यिकीय माहितीचे अधिक आकलन होण्यासाठी स्तंभालेख, वृत्तालेख, रेषालेख, वर्तुळालेख अशा प्रकारच्या आलेख पद्धतींचा उपयोग केला आहे.

सामाजिक संशोधन पद्धतीमधील विषयाला अनुकूल अशा सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत सहेतूक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

नमूना निवड

प्रस्तुत संशोधन विषयाचे तथ्य संकलन करण्यासाठी गैर संभाव्यता नमूना निवड पद्धती अंतर्गत सहेतूक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्रामध्ये आढळणाऱ्या विमुक्तांच्या १४ जाती व भटक्यांच्या २९ जमाती मिळून ४३ जाती-जमाती आहेत. यापैकी विमुक्त जाती ५ त्यामध्ये बंजारा, कैकाडी, पारधी, राजपूत, वडार आणि भटक्या जमाती ५ त्यामध्ये बेलदार, भोई, धनगर, गोसावी, वंजारी अशा एकूण १० जाती -जमातींचा अभ्यास केलेला आहे. निवडलेल्या जमातींपैकी प्रत्येक जमातीचे विदर्भातील २० कुटुंबे आणि मराठवाड्यातील २० कुटुंबे असे एकूण प्रत्येक जमातीचे ४० कुटुंब निवडले आहेत. त्याप्रमाणे निवडलेल्या १० जमातींचे मिळून एकूण ४०० कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे निवडलेल्या विमुक्त -भटक्या जमातीच्या ४०० कुटुंबामध्ये ५० टक्के कुटुंब ग्रामीण भागातील (गावपातळी वरील) आहेत. तर उर्वरित ५० टक्के कुटुंबे शहरी भागातील (जिल्हा व तालुका पातळीवरील) आहेत.

अभ्यास क्षेत्र म्हणून मराठवाडा व विदर्भ असे दोन प्रादेशिक विभाग निवडले आहेत.

संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे विदर्भ व मराठवाडा या दोन प्रादेशिक विभागापुरतेच मर्यादित आहे. मराठवाडा व विदर्भातील सर्वच विमुक्त-भटक्यांची पाहणी करणे अधिक खर्चिक बाब असल्याने त्यामध्ये देखील मर्यादा ठरविली आहे. विमुक्त-भटक्यांच्या एकूण ४३ जमातींपैकी केवळ १० जमाती नमुना म्हणून निवडलेल्या आहेत. म्हणून प्रस्तुत संशोधन हे निवडलेल्या १० जमातींपुरते मर्यादित आहे. असे असले तरी, हे संशोधन समग्र विमुक्त -भटक्या जमातीसाठी उपयोगाचे आहे.

प्रकरणांची रुपरेषा

प्रस्तुत शोधप्रबंधाची विभागणी वेगवेगळ्या सहा प्रकरणांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक प्रकरणाची मांडणी संशोधन विषयाला अनुसरून करण्यात आली असून प्रकरणनिहाय रुपरेषा पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

१. प्रकरण पहिले - विषय प्रवेश आणि संशोधन पद्धती :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, भटके म्हणजे काय?, विमुक्त म्हणजे काय?, विमुक्त-भटक्यांचा उगम, विमुक्त-भटक्यांची परिभाषा, विमुक्त -भटक्यांचा आर्थिक इतिहास, सामाजिक इतिहास, शैक्षणिक इतिहास, जातपंचायत, गुन्हेगारी कायदा त्याचप्रमाणे संशोधन विषयाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, गृहीतके, संशोधन पद्धती, नमुना निवड, संशोधनाची मर्यादा आणि प्रकरणांची रुपरेषा अशा प्रकारे मांडणी करण्यात आली आहे.

२. प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन :-

सदर प्रकरणाची वेगवेगळ्या तीन भागांत विभागणी करण्यात आली आहे. भाग पहिला - 'पूर्व संशोधन साहित्याचा आढावा' ज्यामध्ये एम.एड्., एम.फिल्. पीएच्.डी. इ. पदवीसाठी सादर करण्यात आलेल्या अप्रकाशित प्रबंधांचा आढावा घेण्यात आला आहे. भाग दुसरा - ''विषय संबंधित साहित्याचा आढावा'' ज्यामध्ये विषयाला अनुसरून लिहिलेली क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल इ. साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

भाग तिसरा ''इतर साहित्याचा आढावा'' ज्यामध्ये मासिके, दिवाळी अंक, स्मरणिका आणि वर्तमानपत्रातील लेख या साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

३. प्रकरण तिसरे - भटक्या-विमुक्त जमातीच्या शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीचे सर्वेक्षण :-

प्रस्तुत प्रकरण दोन भागात विभागण्यात आले आहे.

भाग पहिला - 'शैक्षणिक स्थिती', ज्यामध्ये विमुक्त-भटक्यांचा शैक्षणिक इतिहास, शिक्षणाचा उद्देश, शिक्षणाचे महत्त्व, शैक्षणिक तरतुदी आणि शैक्षणिक स्थितीचे प्रत्यक्ष सर्वेक्षण इ. बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

भाग दुसरा - 'सामाजिक स्थिती' ज्यामध्ये विमुक्त-भटक्यांच्या पोटजाती, उपजाती, राहणीमान, वेशभूषा, देव-देवता, अंधश्रद्धा आणि प्रत्यक्ष सामाजिक सर्वेक्षण अशा प्रकारे मांडणी केली आहे.

४. प्रकरण चौथे -भटक्या विमुक्त जमातीच्या आर्थिक स्थितीचे सर्वेक्षण:-

या प्रकरणात प्रस्तावना, विमुक्त -भटक्यांची वार्षिक उत्पन्नाची स्थिती, खर्चाची स्थिती, शेतीविषयक स्थिती, सिंचनाची स्थिती, कर्जविषयक स्थिती, व्यवसायिक स्थिती, स्थलांतरणाचे प्रमाण, स्थावर मालमत्ता, उपलब्ध सोयी सुविधा, रोजगाराची स्थिती, दारिद्र्याचे प्रमाण, ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य इत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

५. *प्रकरण पाचवे - शासकीय योजना व भटक्या विमुक्त जमाती :-*

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, विमुक्त-भटक्यांच्या योजनेचा आढावा, योजनात्मक तरतुदी, शासकीय योजनेचे लाभधारक त्यामध्ये कर्जमाफी लाभधारकाचे प्रमाण, संजय गांधी निराधार योजना, घरकूल योजना, अंत्योदय योजना, श्रावण बाळ योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, सोसायटी, पिक विमा योजना इत्यादी योजनांचे लाभधारक तसेच वसंतराव नाईक महामंडळाचे लाभधारक इत्यादी लाभधारकांचे प्रमाण नमूद केले आहे. शेवटी भारतातील निवडक जमातीची लोकसंख्या आणि समारोप अशा प्रकारे मांडणी केली आहे.

६. *प्रकरण सहावे - निष्कर्ष आणि शिफारशी :-*

प्रस्तुत प्रकरणात संशोधन सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी महत्त्वाचे निष्कर्ष आणि शिफारशी पुढील प्रमाणे देण्यात आल्या आहेत.

निष्कर्ष

१. विमुक्त-भटक्यांच्या प्रत्यक्ष पाहणीतून असे लक्षात येते की, मराठवाडा-विदर्भ प्रदेशात एकूण ४०.०४ टक्के विमुक्त -भटके साक्षर आहेत. तर ५९.९६ टक्के विमुक्त-भटके निरक्षर आढळून आले आहेत.

२. स्त्री-पुरुष साक्षरतेच्या तुलनात्मक अध्ययनावरून असे स्पष्ट होते की, एकूण २७.७५ टक्के स्त्रिया साक्षर आहेत व ७२.२५ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. त्या तुलनेत पुरुष साक्षरतेचे प्रमाण ५०.९६ टक्के एवढे आहे तर निरक्षरतेचे प्रमाण ४९.०४ टक्के एवढे आढळून आले आहे.

३. मराठवाडा व विदर्भ प्रदेशाच्या तुलनात्मक साक्षरतेचे प्रमाण अभ्यासले असता असे लक्षात आले की, मराठवाड्यात ३९.३६ टक्के विमुक्त -भटके साक्षर आहेत व ६०.६४ टक्के निरक्षर आहेत. त्या तुलनेत विदर्भात ४०.४२ टक्के विमुक्त-भटके साक्षर आहेत. तर ५९.५८ टक्के निरक्षर आढळून आले आहेत.

४. विमुक्त-भटक्यांच्या एकूण साक्षरतेमध्ये १५.९६ टक्के प्राथमिक शिक्षण पूर्ण करणारे आहेत. ९.८० टक्के माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत. ६.४५ टक्के उच्च शिक्षण घेतलेले, ४.६१ टक्के पदवी पूर्ण करणारे तर ३.२२ टक्के पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आढळून आले आहेत.

५. स्त्रियांच्या एकूण साक्षरतेमध्ये १०.५८ टक्के स्त्रिया प्राथमिकपर्यंत शिकलेल्या आहेत. ७.२९ टक्के स्त्रिया माध्यमिक पर्यंत शिकलेल्या आहेत. ४.१७ टक्के उच्च माध्यमिक,

३.१२ टक्के पदवी आणि १.९९ टक्के स्त्रिया पदव्युत्तर शिकलेल्या आहेत. पदव्युत्तर शिक्षणाचे प्रमाण स्त्रियांमध्ये खूपच कमी असलेले दिसून आले आहे.

६. विमुक्त-भटक्यांच्या सामाजिक पाहणीतून असे दिसून आले आहे की, ७९ टक्के विमुक्त-भटके हिंदू धर्म मानणारे आहेत. ३.२५ टक्के कुटुंबे कोणताच धर्म मानत नाहीत. ७.२५ टक्के कुटुंबे मानवता हाच धर्म आहे असे मानतात. ६.२५ टक्के कुटुबांना धर्मच माहीत नाही आणि ४.२५ टक्के कुटुंबे जातीलाच धर्म मानणारे आढळून आले आहेत.

७. एकूण विमुक्त-भटक्या जमातींपैकी ८२.५० टक्के कुटुंबे देवाला मानतात तर ११.२५ टक्के कुटुंबे देवाला मानत नाहीत आणि उर्वरित ६.२५ टक्के कुटुंब निसर्ग हाच देव आहे असे मानतात. म्हणजेच बहुतांश विमुक्त-भटक्यांना देव ही संकल्पना मान्य आहे.

८. नवसाच्या संदर्भात असे दिसून येते की, एकूण ५५.५० टक्के विमुक्त-भटके देवाला नवस करतात तर ४४.५० टक्के कुटुंब कोणतेही नवस करत नाहीत. एकूण नवस करणाऱ्यांपैकी ६५.७६ टक्के कुटुंब नवसातून लाभ प्राप्त झाल्याचे नमूद करतात तर ३४.३३ कुटुंबांना कोणताही लाभ झालेला नाही ते केवळ परंपरा म्हणून नवस करतात.

९. विमुक्त-भटक्या जमातींमध्ये जात पंचायतीला विशेष महत्त्व आहे. ६३.२५ टक्के कुटुंब आजही जातपंचायतीला मानतात. २५.७९ टक्के कुटुंब जातपंचायतीला महत्त्व देत नाहीत. तर ११ टक्के कुटुंबांना जात पंचायत म्हणजे काय? हेच माहीत नाही, असे आढळून आले आहे.

१०. जात पंचायतीला महत्त्व देणाऱ्या विमुक्त-भटक्या कुटुंबापैकी ६०.८७ टक्के कुटुंबांनी जातपंचायतीत योग्य न्याय मिळतो असे नमूद केले आहे. तर ३१.६२ टक्के कुटुंबांनी जातपंचायतीत योग्य न्याय मिळत नाही असे नमूद केले आहे आणि ७.५१ टक्के कुटुंब अशी आढळून आली की, ज्यांनी कोणतेही उत्तर न देता तटस्थ भूमिका व्यक्त केली आहे.

११. समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक संघटन महत्त्वाचे असते. परंतु ६६ टक्के विमुक्त-भटके कुटुंबांना सामाजिक संघटनेची कोणतीही माहिती नाही. तर केवळ ३४ टक्के कुटुंबांना सामाजिक संघटनेचे महत्त्व माहीत आहेत. म्हणजेच बहुतांश भटके-विमुक्त संघटित नाहीत.

१२. प्राचीन काळी विमुक्त-भटक्या जमातीत नक्षीकाम केलेल्या वस्त्रांना अत्यंत महत्त्व होते; परंतु अलिकडे त्याचे महत्त्व कमी झाले आहे. केवळ ८ टक्के कुटुंबे नक्षीकाम केलेले वस्त्र वापरताना आढळून आले तर ९२ टक्के कुटुंबे अशी आहेत की, जे आधुनिक वस्त्र परिधान करतात.

१३. विमुक्त-भटक्यांची वार्षिक उत्पन्नाची स्थिती पाहता असे लक्षात येते की, ३१.२५ टक्के कुटुंबाचे उत्पन्न ५० हजारांपेक्षा कमी आहे. ५१ हजार ते १ लाख दरम्यान २६.५० टक्के कुटुंबे आहेत. १९.५० टक्के कुटुंबे १ लाख ते १.५० लाखाच्या दरम्यान उत्पन्न असणारे आहेत. १४.७ टक्के कुटुंबे १.५० ते २.०० लाख उत्पन्न असणरे आहेत आणि ८.७५ टक्के कुटुंबांचे उत्पन्न २ लाखांपेक्षा अधिक आहे असे प्रत्यक्ष पाहणीतून दिसून आले आहे.

१४. कौटुंबिक मासिक खर्चाच्या स्थितीवरून असे दिसून येते की, ३९.५० टक्के कुटुबांचा मासिक खर्च २५०० रुपयांपेक्षा कमी आहे. तर २५०१ ते ५००० रु. २७.५० टक्के कुटुंब, ५००१ ते ७५०० रुपये खर्च असणारे १६.२५ टक्के, ७५०१ ते १० हजार रुपये खर्च असणारे १०.७५ टक्के आणि १० हजारांपेक्षा अधिक खर्च असणारे ६ टक्के कुटुंब आढळून आली आहेत.

१५. विमुक्त-भटक्यांच्या एकूण ४०० कुटुंबांपैकी ६८ टक्के कुटुंबाकडे स्वत:ची शेती आहे. तर उर्वरीत ३२ टक्के कुटुंबे भूमिहीन आहेत. ते मजुरी करून स्वत:चा उदरनिर्वाह करतात.

१६. शेती असणाऱ्या एकूण कुटुंबांपैकी १४.३४ टक्के कुटुंबाची शेती हंगामी-बागायती आहे. तर ६.६५ टक्के कुटुंबाची शेती बारामही बागायती आणि ७९.०४ टक्के कुटुंबाची शेती निव्वळ कोरडवाहू आहे. एकूण बागायती शेती असणाऱ्या कुटुंबातून ६१.४० टक्के कुटुंबाकडे विहीर आहे. १५.७९ टक्के कुटुंबाकडे कुपनलिका आहेत, १४.०४ टक्के कुटुंबे धरणाचा वापर करतात. तर ८.७७ टक्के कुटुंबे केवळ कालव्याद्वारे शेती सिंचित करतात, असे आढळून आले आहे.

१७. विमुक्त-भटक्यांच्या एकूण ४०० कुटुंबांपैकी ४५.७५ टक्के कुटुंबे व्यवसायासाठी बाहेरगावी जातात. तर ५४.२५ टक्के कुटुंबे स्थायिक आढळून आले आहेत. बाहेरगावी जाणाऱ्या कुटुंबापैकी ३६.६१ टक्के कुटुंबे ऊसतोडणीसाठी बाहेर गेलेले आहेत. तर

३२.२४ टक्के कुटुंबे जाती व्यवसायासाठी बाहेरगावी जातात आणि ३१.१५ टक्के कुटुंबे बिगारी कामासाठी बाहेरगावी जातात असे आढळून आले आहे.

१८. विमुक्त-भटक्यांची कर्जाची स्थिती पाहता असे दिसून येते की, ५९.७५ टक्के कुटुंबे कर्जबाजारी आहेत. ४०.२५ टक्के कुटुंबांनी कोणतेही कर्ज घेतलेले नाही. कर्ज घेणाऱ्या कुटुंबापैकी ५८.५८ टक्के कुटुंबे नियमित कर्जाची परतफेड करतात. तर ४१.४२ टक्के कुटुंबांना कर्जाची परतफेड करणे शक्य होत नाही असे आढळून आले आहे.

१९. विमुक्त-भटक्यांच्या एकूण ४०० कुटुंबांपैकी३५.५ टक्के कुटुंबे दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. त्यामध्ये ४३ टक्के ग्रामीण आणि २८ टक्के शहरी दारिद्रयाचे प्रमाण आहे. या तुलनेत समग्र महाराष्ट्रात ग्रामीण २९.५ टक्के, शहरी १८.३ टक्के आणि एकूण महाराष्ट्रात २४.५ टक्के दारिद्रयाचे प्रमाण आहे तर समग्र भारतात ग्रामीण ३३.८ टक्के, शहरी २०.९ टक्के आणि एकूण भारतात २९.८ टक्के दारिद्रयाचे प्रमाण आहे.

२०. भारतामध्ये सन १९३१ साली शेवटची जातीनिहाय जनगणना झाली होती. तेव्हा निवडलेल्या या १० जमातींची लोकसंख्या १,१५,०९,९३९ एवढी होती. त्यापूर्वी १९२१ साली ९०,३०,६२५ एवढी ही लोकसंख्या होती. त्यातील सरासरी वृद्धीदर १.२७ टक्के एवढा आहे. त्यानुसार २०११ साली ७,१५,८७,९२० एवढी लोकसंख्या झाली आहे.यावरून ३०११ मध्ये ही लोकसंख्या १,०३,९०,८१,७२६ एवढी राहील असे सिद्ध झाले आहे.

शिफारशी :-

मराठवाडा व विदर्भातील विमुक्त-भटक्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक पाहणीतून जी निष्कर्ष समोर आली आहेत, त्या निष्कर्षाला अनुसरून काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे-

१. विमुक्त-भटक्या जमातीमध्ये ५९.९६ टक्के निरक्षरता आहे. यामुळे त्यांचा विकास होणे शक्य नाही म्हणून या जमातीच्या साक्षरता दरात वाढ घडवून आणणे महत्त्वाचे वाटते. त्यासाठी शासनाने सवलती दिल्या पाहिजे व जनतेनेही प्रतिसाद दिला पाहिजे.

२. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. एकूण ७२.२५ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. स्त्री साक्षरता वाढविण्याची नितांत गरज आहे. त्या शिवाय या जमातीचा विकास होणार नाही, म्हणून स्त्रियांनी शिक्षण घेतलेच पाहिजे.

३. जे विमुक्त-भटके साक्षर आहेत ते केवळ माध्यमिकपर्यंत अधिक आहेत. पदवी, पदव्युत्तर शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे, विमुक्त-भटक्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून शासनाने शिष्यवृत्तीत वाढ करावी आणि नवीन अशा काही शिक्षणासाठी आर्थिक साहय करणाऱ्या योजना तयार कराव्यात.

४. विमुक्त-भटक्या जमातीत मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा दिसून आली आहे, नवसावर खर्च करणारे अनेक आढळून आले आहेत. या सर्व प्रथा बंद केल्या पाहिजेत. नरबळी देणाऱ्यांवर गुन्हा नोंद केला पाहिजे.

५. विमुक्त-भटक्या जमातीत जातपंचायतीचे महत्त्व कमी होत चालले आहे. कारण जातपंचायतीत योग्य न्याय मिळत नाही असा सूर निघत आहे. गरीब कुटुंबावर अन्याय करणाऱ्या व चुकीचा न्याय देणाऱ्या पंचावर कार्यवाही करून शासनाने कठोर शिक्षा दिली पाहिजे.

६. विमुक्त-भटक्या जमातीत विवाह प्रसंगी वधूकडून मोठ्या प्रमाणावर हुंडा घेतला जात आहे, हुंडा घेणे कायद्याने गुन्हा आहे. तरी ते थांबविले जात नाही, म्हणून सरकारने या बाबीकडे विशेष लक्ष देऊन गरीब वधुपित्याची पाठ राखण केली पाहिजे.

७. विमुक्त-भटक्या जमातीत सामाजिक संघटनेचा अभाव आहे. सामाजिक, आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी या जाती-जमातीने एकत्र यायला पाहिजे, एकजुटीने आपले प्रश्न सोडविले पाहिजे अशी शिफारस या जाती-जमातीसाठी करता येईल.

८. विमुक्त-भटक्या जमातीची वार्षिक उत्पन्नाची पातळी अत्यंत निम्न आहे. बहुतांश विमुक्त-भटक्यांचे उत्पन्न १ लाखाच्या आत आहेत. यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी शासनाने भांडवल पुरविले पाहिजे, व्यवसायातील कर्जाची तरतूद केली पाहिजे.

९. एकूण ३२ टक्के विमुक्त-भटके भूमिहीन आहेत. केवळ मजुरी करून उदरनिर्वाह करतात, परंतु त्यांना बारामाही मजुरी मिळत नाही. म्हणून शासनाने विमुक्त-भटक्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे वाटते.

१०. बहुतांश विमुक्त-भटके शेतकरी आहेत. ८० टक्के शेतकऱ्यांची शेती कोरडवाहू आहे, शेती सिंचित असावी अशी सर्वांची अपेक्षा आहे म्हणून शासनाने सिंचनासाठी मोठे कर्ज उपलब्ध करून द्यावे आणि सिंचन क्षेत्राच्या वाढीस प्रतिसाद द्यावा.

११. विमुक्त-भटक्यांची रोजगाराची स्थिती अत्यंत बिकट आहे, केवळ ७.८८ टक्के लोकांचा नोकरीत सहभाग आहे. उर्वरीत ९२.१२ टक्के लोकांचा शेती क्षेत्रात भरणा आहे.

आवश्यक्तेपेक्षा अधिक लोक शेती करीत आहेत. ही छुपी बेकारी थांबविण्यासाठी शासनाने व्यसायिक कर्जे देऊन या जाती-जमातीला सहकार्य केले पाहिजे.

१२. विमुक्त-भटक्यांना राहण्यासाठी घरे नाहीत. अनेक कुटुंबे उघड्यावर राहतात. या समस्येचे निरसन होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने घरकुल योजना प्रभावीपणे राबविली पाहिजे.

१३. निराधार, अंत्योदय, घरकूल या योजनेच्या लाभधारकाकडून मोठ्या प्रमाणावर दलाली घेतली जाते, सरकारने या बाबीकडे लक्ष देऊन दलालांना रोक लावला पाहिजे.

१४. अनुसूचित जाती-जमातीसाठी शासनाने स्वतंत्र योजना राबविल्या आहेत. त्याचा अनुकूल परिणाम या जाती-जमातीवर दिसून येत आहे. परंतु विमुक्त-भटक्यांसाठी स्वतंत्र योजनांची कमतरता आहे. म्हणून शासनाने विमुक्त-भटक्यांसाठी स्वतंत्र योजना राबविल्या पाहिजेत.

१५. वसंतराव नाईक महामंडळाचे लाभधारक अत्यंत कमी आहेत. मुळात या महामंडळाचा निधीच कमी आहे. शासनाने या महामंडळाला अधिक निधी देऊन विस्तार वाढविला पाहिजे, जेणे करून विमुक्त-भटक्या जमातीला, स्वावलंबी होण्यास मदत होईल.

मार्गदर्शक
डॉ. ए. एस. पवार
सहयोगी प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

संशोधक
श्री. अरुण रामराव चव्हाण,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.